
चला तंबाखूमुक्त शाळा बनवूया
तंबाखूमुक्त शाळांचे ०९ निकष
SALAAM MUMBAI FOUNDATION
Choose LIFE Not Tobacco
SALAAM MUMBAI FOUNDATION
COTPA
Guidelines
TOBACCO FREE EDUCATIONAL INSTITUTION
हल्लाबोल
राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत आरोग्य विभाग भारत सरकारद्वारे तंबाखूमुक्त शाळांसाठी ९ निकष पारित केले आहेत.

SALAAM MUMBAI FOUNDATION

निकष १ अ : शैक्षणिक संस्थेच्या आवारात ६० सें. मी. X ४५ सें. मी. आकाराचा "तंबाखूमुक्त परिसर" चा फलक असावा.

निकष १ ब : या फलकावर अधिकृत व्यक्तीचे नाव / हुद्दा / संपर्क क्रमांकाचा उल्लेख (साइन बोर्डवर) असावा.

पुरावा : "तंबाखूमुक्त परिसर" असा ६० से. मी. X ४५ से. मी. बोर्ड / बॅनरचा फोटो असावा.






निकष २ अ : "तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था" प्रवेशद्वाराच्या सीमेवर / शैक्षणिक संस्थेच्या बाह्य भिंतीवर ६० से. मी. x ४५ से. मी. आकाराचा फलक लावलेला असावा.

SALAAM MUMBAI FOUNDATION

निकष २ ब : या फलकावर अधिकृत व्यक्तीचे नाव / पदनाम / संपर्क क्रमांकाचा उल्लेख फलकावर (साइन बोर्डवर) असावा.

पुरावा : "तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था" चा फलक शैक्षणिक संस्थेच्या बाह्य भिंतीवर ६० से. मी. x ४५ से. मी. आकाराच्या बोर्डचा / बॅनरचा फोटो असावा.






SALAAM MUMBAI FOUNDATION

## निकष ३ : शैक्षणिक संस्थेच्या आवारात तंबाखूजन्य पदार्थांच्या वापराचा पुरावा असू नये.
## उदा. सिगारेट / बिडीचे टुकडे किंवा गुटखा/तंबाखूचे पाउच, भिंतीवर थुंकल्याचे डाग इत्यादी

**पुरावा : आपल्या शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसराचा फोटो व मुख्याध्यापकांच्या सहीचे घोषणापत्र.**





घोषणापत्र

### तंबाखूमुक्त शाळा परिसर

आम्ही असे लिहून देतो कि,
आमच्या.......................................................या
शैक्षणिक संस्थेमध्ये राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखूमुक्त शाळा अभियान चालू आहे. यानुसार या शालेय परिसरात कोणत्याही प्रकारचे तंबाखूजन्य पदार्थ त्याचे सेवन व विक्री होत नाही. तसेच सिगारेट/बिडीचे तुकडे किंवा गुटखा / तंबाखूचे पाऊच, भिंतीवर थुंकणे आणि जाहिरात करणे यांस संपूर्ण प्रतिबंध आहे.
या शैक्षणिक संस्थेच्या आवारात तंबाखूजन्य पदार्थांच्या वापराचा कोणताही पुरावा नाही.

आपले विनीत,

मुख्याध्यापक,
सही व शिक्का

SALAAM MUMBAI FOUNDATION

## निकष ४ : तंबाखूच्या दुष्परिणामांवर आधारीत पोस्टर किंवा तंबाखूच्या दुष्परिणामांवर आधारीत साहित्य शाळेत प्रदर्शित केलेले असावे.

पुरावा : विद्यार्थ्यांकडून तंबाखूच्या दुष्परिणामांचे, घातक रसायनांचे, सत्यता, COIPA २००३ व ९ निकषांची माहिती असणारे पोस्टर तयार करून शाळेत चिकटवणे. यासोबत शिक्षक/ विद्यार्थी यांचा फोटो घेणे.





निकष ५. शैक्षणिक संस्थेत गेल्या सहा महिन्यांत किमान एक तंबाखू नियंत्रणावर आधारीत उपक्रम राबववणे.

उदा. तंबाखूमुक्त शाळा रांगोळी स्पर्धा, तंबाखू विरोधी प्रभातफेरी, मुखतपासणी करीत असताना, सत्कार समारंभ करीत असताना, कायदयाची माहिती देत असताना, जागतीक कर्करोग दिन साजरा करताना, ३१ मे जागतिक तंबाखू विरोधी दिवस साजरा करताना, नववर्ष संकल्प दिवस, जागतिक मानव अधिकार, सेहत की राखी, बालदिन, सण-उत्सव, तंबाखू मुक्तीची शपथ इ.

पुरावा : ह्यापैकी कोणत्याही एका उपक्रमाचा फोटो ज्यामध्ये तंबाखू नियंत्रण कार्यक्रम/तंबाखू विरोधी कार्यक्रम असा उल्लेख असेल.








निकष ६ : शैक्षणिक संस्थेने अधिकृत व्यक्ती तंबाखू मॉनिटर्स म्हणून (कर्मचाऱ्यांमधून, अधिकारी किंवा शिक्षक किंवा विद्यार्थी प्रतिनिधी मधील (नेमणुका) नेमले पाहिजेत. फलकावर तंबाखू मॉनिटर्सची नावे, पद/हुद्दा आणि संपर्क नंबर नमूद केले जावेत.

पुरावा : साइन बोर्डवर/चार्ट पेपरवर तंबाखू मॉनिटरचे नाव, हुद्दा आणि फोन नंबर देखील नमूद केले पाहिजेत. (तंबाखूचा वापर करणाऱ्यांना तंबाखू मॉनिटर्स म्हणून नियुक्त केले जाऊ नये याची काळजी घेतली पाहिजे.)

## तंबाखूमुक्त शाळा मॉनिटर्स

शाळेचे/संस्थेचे नाव : ______________________

मुख्याध्यापकांचे नाव : ______________________

| क्र. | तंबाखू मॉनिटरचे नाव | हुद्दा/पद | फोन नंबर |
|---|---|---|---|
| १ | शिक्षक | | |
| २ | शिक्षक | | |
| ३ | विद्यार्थी प्रतिनिधी | | |
| ४ | विद्यार्थी प्रतिनिधी | | |
| ५ | विद्यार्थी प्रतिनिधी | | |

SALAAM MUMBAI FOUNDATION

SALAAM MUMBAI FOUNDATION

## निकष ७ : "तंबाखूचा वापर शाळेच्या परिसरात केला जाणार नाही." हा नियम शैक्षणिक संस्थेच्या आचार संहितेमध्ये (CODE OF CONDUCT) समाविष्ट केला गेला पाहिजे.

पुरावा :- शालेय परिसरात कोणत्याही प्रकारचे तंबाखूजन्य पदार्थ बाळगणे, सेवन करणे, विक्री करणे आणि जाहिरात करणे ह्यावर बंदी असून सदर नियमाचे उल्लंघन करणाऱ्यावर मॉनेटर / मुख्याध्यापक किंवा प्रभारी अधिकारी ह्यांकडून कार्यवाही करण्यात येईल.

( सदर पत्र TOBACCO FREE SCHOOL APPवर UPLOAD करताना, कृपया त्यावर स्वाक्षरी आणि शिक्का तसेच शाळेच्या लेटरहेड वर लिहलेला असणे अनिवार्य आहे.)


SADHANA VIDYALAYA (SECONDARY)

Head Mistress


आझाद विद्यालय, कासेगांव.

SALAAM MUMBAI FOUNDATION

निकष ८ : शैक्षणिक संस्थेच्या बाह्य भिंतीपासून १०० यार्ड क्षेत्र रेखांकीत केले गेले पाहिजे.

पुरावा :- शाळेचा 100 यार्ड पर्यंत परिसर दिसेल असा पिवळ्या रंगाने रेखांकित करून तेथे "तंबाखूमुक्त क्षेत्र" असे नाव लिहून त्याचा फोटो घ्यावा.
(त्यात शाळेचे नाव किंवा मुले, शिक्षक, मुख्याधापक, पालक सोबत फोटो घ्यावा.)








SALAAM MUMBAI FOUNDATION

## निकष ९ : तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणारे कोणतेही दुकान शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्डात नसावे.

पुरावा : सदर पत्र TOBACCO FREE SCHOOL APP वर अपलोड करताना, त्यावर मुख्याध्यापक /प्रभारी अधिकारी ह्यांचे नाव, सही आणि शिक्का असणे अनिवार्य आहे.
जर एखादे दुकान असेल तर स्थानिक अधिकारी सरपंच/तहसीलदार/NTCP/आरोग्य अधिकारी/पोलीस/FDA ह्यांना ह्या पत्राद्वारे कळवावे.




घोषणापत्र

### तंबाखूमुक्त शाळा परिसर

आम्ही असे लिहून देतो कि,
आमच्या.............................................................या शैक्षणिक संस्थेमध्ये राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखूमुक्त शाळा अभियान चालू आहे. यानुसार या शैक्षणिक संस्था परिसराच्या १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणारे कोणतेही दुकान नाही / आहे.
COTPA २००३ कायद्यातील कलम ६ अनव्ये येथे तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास संपूर्ण प्रतिबंध आहे.

आपले विनीत,

मुख्याध्यापक,
सही व शिक्का

SALAAM MUMBAI FOUNDATION




# धन्यवाद